स्थायी समितीच्या मंगळवार दिनांक 07–08–2012 रोजी दुपारी 12–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 7. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 8. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 9. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 10. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 11. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 12. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 2. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 3. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 4. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |

उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड.सिद्यीकी, उप निगम आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 96 :— स्थायी समिती ठराव क्रं.४५ दि २८/०६/२०१२
अन्वये दहन घाटावरील मृत देहांना अग्नी देण्याकरीता लाकडांचा पूरवठा करण्यास दोन वर्षाकरीता निविदा मागविण्यात आल्या. पात्र असलेली एकमेव निविदा में.महेश सेल्स कॉरपोरेशन, नागपूर यांची प्रती टन रु.४४९१/— दराची प्राप्त झाली. दहनघाटावर लाकडाचा अपुरा, खंडीत किंवा अनियमीत पुरवठा झाल्यास प्रसंग अतिशय गंभीर व संवेदनशील होवुन असंतोष निर्माण होतो. व मनपाची बदनामी होत असल्यामुळे खुल्या बाजारामधुन बाजार दराने सरळ लाकडे खरेदी करण्यात येवुन फरकाची रक्कम निविदाकाराकडून वसुल करण्यात येईल. या करीता सर्व संबंधीत विभागीय अधिकारी (स्वच्छता) यांना प्रती दहनघाट रुपये ५०,०००/— अग्रीम देणे आवश्यक राहील. तरी प्राप्त दर प्रती टन रु.४४९१/— मंजुर करुन अंदाजीत ६६७५ टन लाकडांच्या वार्षीक खरेदीवर एकुण रुपये २,९९,७७,४२५/— खर्च अपेक्षीत धरुन निविदा दोन वर्षाकरीता मान्य करण्याचा व यावर होणारा खर्च आय—व्यय पद क्रं.२४९ मधुन भागविण्याचा व लाकुड खरेदी करण्यासाठी अधिक प्रावधानाची तरतुद करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून म.न.पा. विधी सल्लागार यांचे अभिमतानुसार प्रस्तावित विषयास एकमताने मंजुरी प्रदान करण्यांत येते. तसेच पारडी व जयताळा दहनघाट या दोन्ही दहन घाटांना समाविष्ट करुन लाकडांचा या दहन घाटांवर पुरवठा करण्यास मंजुरी प्रदान करते, प्रस्तावित सर्व दहन घाटावर येणारा लाकडांचा पुरवठा हा दहन घाटावरील शेडमध्ये टाकण्याचा, पुरवठादाराला बंधन कारक राहील.

तसेच नागपूर शहरातील इतर दहनघाट जे म.न.पा. ला हस्तांतरीत झाले नाही, त्यांचे संपूर्ण सेर्वेक्षण करुन त्या दहन घाटांवर काय सोयी आहे. याची प्रशासनाद्वारे पाहणी करावी व त्यांचा समावेश करण्यास्तव विभागीय प्रस्ताव स्थायी समिती समोर लवकरात लवकर सादर करावा यांस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 97 :— आरोग्य विभागाच्या सर्व झोन, हिवताप व हत्तीरोग
तसेच इतर विभागासाठी खालील नमूद किटकनाशक साहित्य खरेदी करण्यासाठी निविदा मागवून दोन वर्षासाठी दरकरार करण्यात येईल.

| अ. क्रं. | साहित्याचे नांव | बाजार दरानूसार | झोनतर्फे वर्ष २०१२—१३ ची मागणी | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | Dichlorovs 76% EC | रु. 720/— लि. | 500 लि. | Rs. 360000/- |
| २ | Monochlorophenol liquid with DCMX in S.S. Emulsion | रु. 480/— लि | 500 लि. | Rs. 240000/- |
| ३ | Black Phenyle Grade-I<br>Disiinfectant Fluid RWC 1 | रु.66.25/— लि. | 5000 लि. | Rs. 331250/- |
| ४ | Citronella Oil | रु. 550/— लि | 800 लि | Rs. 440000/- |
| ५ | Soap | रु. 21/— नग | 21350 नग | Rs. 448350/- |
| ६ | Pyrosene oil E | रु. 525/— लि. | 2000 लि. | Rs. 1050000/- |
| ७ | Deltamenthrin 1.25 ULV | रु. 1600/— लि | 200 लि. | Rs. 320000/- |
| ८ | Cyphenothrin 5 % EC | रु. 950/— लि | 250 लि. | Rs. 237500/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | Bio- Logi Culture | रु. 850/— नग | 350 लि | Rs. 297500/- |
| १० | Temephos 50% EC | रु. 1450/— लि | 150 लि | Rs. 217500/- |
| | | | एकुण खर्च | Rs.39,42,100/- |

नमूद वरिल खरेदीवर वार्षीक रु. ३९,४२,१००/— खर्च अपेक्षीत राहील. हा खर्च पद क्रं ६०६ व २०६ किंवा इतर पदा मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 98 :— विकास नगर येथे विवेकानंद शाळेजवळ इंडोर स्पोर्टस कॉम्प्लेक्स चे बांधकाम पूर्ण करण्याकरिता तयार केलेले अतिरिक्त बाबीकरीता रु.61,98,321/— चे कार्यादेश देण्याकरिता निवेदेतील जुन्याच अटी व शर्तीवर मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून प्रस्तावित काम पद क्र. ५७४, बांधील खर्चातुन करण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 99 :— पोलीस लाईन टाकळी येथील तलावाचे सौंदयीकरण व विकास करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 49,72,437/— च्या सुधारित प्राकलनास मान्यता प्रदान करुन हे काम सध्या करित असलेले कंत्राटदार मे.दिप कंन्स्ट्रक्शन यांचेकडून त्यांचे मंजुर निविदा दरानुसार म्हणजेच प्राकलनीय दरापेक्षा 11.17 टक्के नी कमी दरानुसार करुन घेण्यास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न तसेच स्थायी समिती ठराव क्र. 74/दि. 11.07.2012 अन्वये विचारणा केल्यानुसार तलावाचे प्रस्तावित काम पद क्र. 665 "आकस्मीक खर्च" या पदशिर्षाअंतर्गत मा. आयुक्त यांचे अनुमतीने प्रस्तावित करण्यात आले होते. तथापी पद क्र. 666 "नदी, नाले व तलाव पुनरुजीवन प्रकल्प राबविणे" या पदशिर्षाअंतर्गत प्रस्तावित कामास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 100 :— म.न.पा.च्या विविध विभागांना संगणक ऑपरेटर्स (Computer Opertors) चा पुरवठा करणे यासाठी.

अ) या कामासाठी एकूण 100 संगणक ऑपरेटर्स (Computer Opertors) रु. 9954/— प्रति माह प्रति संगणक ऑपरेटर (Computer Opertors) याप्रमाणे एका वर्षासाठी रु.1,19,44,800/— चा प्राकलनीय खर्च अपेक्षीत आहे. उपरोक्त खर्चास व निविदा बोलावून हे काम करण्यांस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ब) प्राकलन Minimum Wages Act 1948 मधील Shop आणि Establistment या ) च्या दरांचा आधार घेऊन तयार केलेले आहेत. सबब,कंत्राटदारास किमान दर देणे आवश्यक राहील. Minimum Wages Act मध्ये शासनाचे दर वाढल्यास, त्या अनुषंगाने जी वाढ होईल, त्याचा फरक ( Basic Pay & Special Pay,

PF,ESIC,Service Tax,etc.) मनपाव्दारे कंत्राटदारास देय राहील. शासनाचे दर ज्या तारखेपासून वाढतील त्या तारखेपासून हा फरक कंत्राटदारास देय राहील. या बाबीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

क) निविदाकाराने Minimum Wages Act 1948 च्या चालु दरा (Current Rates) पेक्षा ( Basic Pay & Special Pay, PF,ESIC,Service Tax,etc.) कमी दर भरल्यास त्याची निविदा रद्द करण्यांत येईल. या बाबीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 101 :– नागपूर महानगरपालिकेचे मुखपत्र''नागरिक जीवन– लोकसंवाद'' मासिकाचे संपादन,मुद्रण व प्रकाशनाबाबतचे काम जून्याच दराने व अटी शर्तीवर पुढील आर्थिक वर्षाकरिता (2012–13) मेसर्स युनिक फिचर्स ॲन्ड न्यूज प्रायव्हेट जि. यांना देण्यास, तसेच त्यासाठी येणाऱ्या वार्षिक खर्चास मंजुरी देवून हा खर्च कमी होण्याचे दृष्टिने आर्थिक सहाय्या करीता या मासिकासाठी जाहिरातीचे दर निश्चित करण्यास टिप्पणी सह मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

टिपणीः– स्थायी समिती ठराव क्र. 62 दि. 01.07.2008 च्या मंजुरी प्रमाणे नागपूर महानगरपालिकेचे मुखपत्र ''नागरिक जीवन– लोकसंवाद'' माहे ऑगस्ट 2008 पासून नियमित प्रकाशित होत आह. स्थायी समिती ठराव क्र. 28 दि. 30.04.2010 नुसार या मासिकाचे पृष्ठे 48 करण्यात येवून प्रति अंकाचा खर्च रु. 32.50 प्रमाणे हे मासिक प्रकाशित करण्यास कायम स्वरुपी मंजुरी प्राप्त झाली होती. तथापी तत्कालीन मा. आयुक्तांनी हा ठराव कार्यान्वित करतांना आर्थिक वर्ष 2010–2011 साठी मुदतवाढ दिली होती. त्यानंतर मा. आयुक्तांचे दि. 30.04.2011 चे मंजुरीनुसर आर्थिक वर्ष 2011–12 मुदतवाढ देण्यात आली होती.

उपरोक्त मासिकासाठी दरमहा 1,79,238/– खर्च (5000 प्रतिसाठी) अपेक्षित आहे. तथापि मासिकेतील मुखपृष्ठ वगळता इतर 3 रंगीत व सेमी आर्ट पेपरची पृष्ठे खालील प्रमाणे जाहिरातीसाठी उपयोगात आणल्या जावू शकतात.

प्रस्तावित दर :– रंगीत पृष्ठ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पूर्ण पान | –12 महिन्यासाठी | –1,00,000 | अर्धे पान | –12 महिन्यासाठी | –60,000 |
| पूर्ण पान | – 6 महिन्यासाठी | –50,000 | अर्धे पान | – 6 महिन्यासाठी | –35,000 |
| पूर्ण पान | – 3 महिन्यासाठी | –30,000 | अर्धे पान | – 3 महिन्यासाठी | –20,000 |
| पूर्ण पान | – 1 महिन्यासाठी | –12,000 | अर्धे पान | –1 महिन्यासाठी | –8,000 |

या रंगीत पृष्ठा व्यतिरिक्त मासिकातील मधली दोन कृष्ण धवल पृष्ठे (सेंटर स्प्रेड) देखील जाहिरातीसाठी देता येणे शक्य आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पूर्ण पान | –12 महिन्यासाठी | – 50,000 | पूर्ण पान | – 3 महिन्यासाठी | –10,000 |
| पूर्ण पान | – 6 महिन्यासाठी | – 25,000 | पूर्ण पान | – 1 महिन्यासाठी | –5,000 |

या शिवाय महानगरपालिकेच्या 1) ऑरेंज सिटी वॉटर कंपनी 2) एन.एम.पी.एल. (नागपूर महानगर परिवहन लिमिटेड ) 3) एन.ई.एस.एल. 4) रिर्सोर्स मॅनेजमेंट व अन्य कंपन्या कमीत कमी दोन मासिक वरील येणारा खर्च ( वर्षाकाठी ) प्रयोजित केल्यास हा खर्च अत्यंत अल्प स्वरुपात महानगपालिकेला वहन करावा लागेल. संपूर्ण अंक प्रयोजित करण्यात येणाऱ्या कंपनी / संस्था यांचे नांव महानगरपालिके सोबत मुखपृष्ठावर अंकित करण्यात येईल व त्या संस्थेला मधील दोन पाने त्यांच्या जाहिराती करीता उपलब्ध असेल. तरी आता पुढील आर्थिक वर्ष 2012–13 करीत मुदतवाढी साठी व खर्चाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

ठराव क्रमांक 102 :– 1. श्री आर. एम. गोपलानी यांना Site Development Work and Other related construction Work" या कामाचे कार्यदेश क्र. 95/G दिनांक 31.08.2009 रोजी कार्यादेश राशी रूपये 2,88,31,098/– देण्यात आला.

2. सदर कामाचा कालावधी हा 8 महिण्याचा होता.

3. कंत्राटदाराने काम सूरू न केल्यामुळे विभागातर्फे पत्र क्र. 84 दिनांक 19.11.2009 तिन दिवसांचा आत काम सुरू करण्याबाबत सुचना दिल्या अन्यथा Tender Para No. 2 & 40 अन्वये आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल या आशयाचे पत्र जारी करण्यात आले.

4. कंत्राटदाराने यावर दिनांक 27.11.2009 रोजी असे उत्तर दिले की, आर्थीक दृष्टया नविन काम सुरू करण्यास असमर्थ आहे.

5. कंत्राटदाराने काम सुरू न केल्यामुळे व निविदा अटी व शर्ती 2 व 40 नुसार 100 रूपये प्रति दिवस पूर्ण काम संपेपर्यंत नुकसान भरपाई पत्र क्र. 15 दिनांक 27.04.2010 नुसार पत्र देण्यात आले व कंत्राटदारास विनंती करण्यात आली की,लवकर काम सुरू करावे व कामाचा प्रगती करावी.

6. पत्र क्र. 49 दिनांक 09.08.2010 नुसार कंत्राटदारास पत्र देवुन कळविण्यात आलेली, काम सुरू करण्यास आपण उत्सुक दिसुन येत नाही. तरीही आपला करारनामा रद्द का करण्यात येवू नये? अशी विचारणा केली.

7. कंत्राटदाराने दिनांक 05.10.2010 रोजी कार्यालयाला असे कळविले की, कामाचा कार्यदेशाची मुदत 31.08.2009 रोजी संपल्यामुळे मला नविन कार्यादेश देण्यात यावा.

8. यावर पत्र क्र. 79 दिनांक 11.10.2010 द्वारे कंत्राटदारास कळविण्यात आले की, आपण केलेली नविन कार्यादेशाची मागणी ही पी.डब्ल्यु.डी. नियमांचा विरोधात असुन

सदर निविदेच्या अटी व शर्ती मध्ये नमुद नाही. तसेच विभागाचे पत्र क्र. 15 दिनांक 27. 04.2010 च्या नुसार केलेली नुकसान भरपाईची कार्यवाही मागे घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

9. कंत्राटदाराने काम सुरू न केल्यामुळे त्यांच्या कंत्राट संपूष्टात आणुन फेर निविदा प्रसिदध करण्याचे प्रस्तावाला मा. आयुक्त यांनी मंजूरी दिल्यामूळे हा विषय मा. स्थायी समितीपूढे मंजूरी प्रदान करण्यासाठी ठेवण्यात आला.

10. स्थायी समितीच्या ठराव क्र. 985 दिनांक 25.03.2011 नुसार हा प्रस्ताव कार्यालयास परत करण्यास मंजूरी प्रदान केली.

11. कंत्राटदाराने एप्रिल 2011 या महिण्यात काम सुरू केले. त्यावर विभागाने पत्र क्र. 13 दिनांक 21.04.2011 अन्वये कंत्राटदारास योग्य पदधतीने काम करण्याचे निर्देश दिले अन्यथा निविदा शर्ती व अटीनुसार कार्यवाही करण्यात येईल, असे कळविले.

12. कंत्राटदारास पत्र क्र.35 दिनांक 01.06.2011 नुसार कळविण्यात आले की बांधकामाच्या जागी सुरक्षीततेची काळजी घ्यावी व आवश्यक उपाययोजना करावी अन्यथा याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील.

13. कंत्राटदारास कामाचा असमाधानकारक प्रगती असल्यामुळे कामाचा दंड का वाढविण्यात येवू नये या आशयाचे पत्र क्र. 42 दिनांक 03.06.2011 अन्वये देण्यात आले.

14. पत्र क्र. 364 दिनांक 23.11.2011 अन्वये कंत्राटदारास कळविण्यात आले की, आपणांस फायर ब्रिगेड समोरील स्टोअर तोडण्यास काहीही अडचण नाही तसेच फायर सम्प व स्टेअर केसचे काम पूर्ण करण्यास काहीही अडचण नाही. स्वतः मी आयुक्तासमोर काम सुरू करता असे सांगुणही काम सुरू केलेले नाही. M/s. V.K. Associates & Architect यांना कार्यालयाला कळविले आहे की, कंत्राटदारास त्वरीत काम सुरू करण्याचे पत्र द्यावे तसेच उर्वरित काम कुशल कामगांरातर्फे पूर्ण करण्यात यावे. अन्यथा पूढील कार्यवाही करणे भाग पडेल याची नोंद घ्यावी.

15. पत्र क्र. 407 दिनांक 08.12.2011 अन्वये कंत्राटदारास पूनः कळविण्यात आले की आपण काम सुरू केलेले नाही. तसेच आपणांवर सुरू असलेला दंड आपण काम सुरू केल्यामूळे वाढविण्यात येईल. तरीही त्वरीत काम सुरू करून पूर्ण करावे.

16. मा. मुख्य अभियंता यांनी 13.01.2012 रोजी उपरोक्त कामाची बैठक घेतली व असे दिसून आले की, एकुण 20% काम पूर्ण झाले आहे. व कंत्राटदाराने आश्वस्त केले की ते GSR TOP Slab Pump House & Fire Escape ही कामे करतो असे कबूल केले.

17. कंत्राटदाराने दिनांक 21.01.2012 रोजी कार्यालयाला असे कळविले की, मी फक्त R.C.C. Sump Slab व पंप हाऊस चे काम करेल.

18. कंत्राटदाराने 10.02.2012 रोजी कार्यालयाला पत्र देवून काम सुरू ठेवणे शक्य नसल्याचे व काम ज्या स्थितीत आहे तसे संपूष्ठात आणावे अशी विनंती केली.

19. कंत्राटदाराने पूनः दिनांक 24.02.2012 रोजी विनंती केली की काम संपूष्ठात आणावे. (Finalised the work as it is)

20. मा. मुख्य अभियंता यांनी उपरोक्त कामाची बैठक घेतली. या बैठकीत खालील मुद्दयावर बैठकीत निर्देश देण्यात आले.

1. कंत्राटदाराच्या मागणीनुसार Price Escalisation can not be entitled as the said clause was

not exists in the agreement of the work.

2. It was realized that the progress of work as on 03.03.2012 was not satisfactory

3. The work of fire sump & fire escape need to be completed soon. It was assured that, the RCC Slab over sump would be completed before March 2012.

21. पत्र क्र. 675 दिनांक 06.03.2012 अन्वये कंत्राटदारास विनंती करण्यात आली की, त्यांनी खालील कामाची सुरूवात त्वरीत करावी.

1. Sump Work
2. Fire Escape Staircase
3. Ground & road development work
4. Drainage work.

22. पत्र क्र. 690 दिनांक 13.03.2012 अन्वये कंत्राटदारास कळविण्यात आले की आपण अद्याप कामाला सुरूवात केलेली नाही तरी त्वरीत काम सुरू करण्यात यावे अन्यथा आपणास लावलेला दंड वाढविण्यात येईल.

23. कंत्राटदाराने दिनांक 05.05.2012 रोजी पत्र देवून कळविले की, कृपया काम संपूष्टात आणावे (Finalised the work as it is)

24. कंत्राटदाराने 21.05.2012 रोजी कार्यालयाला पत्र देवून कळविले की, ”to please finalized the bill as it is without risk & cost of penalty “ by appropriate clause.

25. प्रकल्प विभागाने कामाच्या सद्यास्थितीबद्दल अहवाल सादर केला होता (कृपया N/73 चे अवलोकन व्हावे) त्यावर मा. आयूक्त यांनी दिनांक 28.05.2012 निर्देश दिले (N/74)

26. वारंवार सुचना देवूनही कंत्राटदार काम करीत नसल्याने व कंत्राटदाराकडुन वारंवार काम संपूष्ठात आणण्याबाबत विनंती करण्यात येत असल्याने सदर काम महत्वाचे व पूर्ण करणे गरजेचे असल्याने याबाबत कंत्राटदारास पुनःच नोटीस देवून सदर काम दोन दिवसाचे आत त्वरीत सुरू करावे त्याचप्रमाणे मा. महापौर यांनी नविन इमारतीची पाहणी दिनांक 06.07.2012 रोजी केली. सदर इमारतीच्या तळमजल्यावरील आयुक्ताचे ऑफिस दिनांक 20.08.2012 पर्यंत पूर्णपणे वापराकरिता तयार करण्याचे निर्देश दिलेले आहे. त्याचप्रमाणे साईट डेव्हलपमेंटचे कंत्राटदार यांना काम पूर्ण

करण्यास पत्र द्यावे अथवा सुरू न केल्यास रितसर कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहे. तरी कंत्राटदारा M/s. गोपलानी यांना वारंवार सुचना देवूनही काम करत नसल्याने निविदा शर्ती व अटी क्र.3 C नुसार कंत्राटदाराच्या Risk & Cost वर निविदा काढुन काम पूर्ण करणे शक्य होईल. या प्रस्तावाला मा. आयूक्त यांनी मंजूरी दिल्यामुळे,निविदा प्रसिध्द करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून प्रशासनाने केलेल्या निवेदनाप्रमाणे उपरोक्त कंत्राटदारास जागा उपलब्ध करुन न दिल्यामुळे व तांत्रिक कारणामुळे कार्य पुर्ण करण्यास विलंब व अडचण निर्माण झाली असे मत दिले. करीता

1. Sump & pump House.
2. Fire Escape Staircase
3 Road development (डांबरीकरणाचे)

जी अर्धवट कामे आहे. ती कंत्राटदारा कडुन प्रशासनाने पुर्ण करुन घ्यावी व हा कंत्राट संपुष्टात आणावा. या दरम्यान इतर कामांची निविदा प्रसिध्द करण्यास एकमताने मंजुरी प्रदान करते. तसेच प्रस्तावित प्रकरणात न्यायीक प्रक्रीया निर्णण होऊ नये याची प्रशासनाने काळजी घ्यावी असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

ठराव क्रमांक 103 :– महानगरपालिका आरोग्य विभागातर्गत आंतर रुग्णालयात व म.न.पा. पॅनलवर वैद्यकीय प्रतिपुर्ती करीता मान्यता असलेल्या खाजगी दवाखान्यात पोटाच्या आतडयांचे आजारांचे उपचार (Gastrointestional diseases) उपलब्ध नसल्यामुळे म.न.पा. पदधिकारी/ अधिकारी/ कर्मचाऱ्यांना या सेवेचा लाभ मिळण्यास अडचण जाते त्यामुळे मिडास मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल प्रायव्हेट लिमिटेड नागपूर हे पोटाच्या आतडयाचे आजारांचे उपचाराची (Gastrointestional diseases) सेवा CGHS दरानुसार म.न.पा. पदाधिकारी / अधिकारी/कर्मचाऱ्यांना देण्यास तयार असल्यामुळे डॉ.एस.व्ही.मुक्केवार कार्य.संचालक मिडास मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल प्रायव्हेट लिमिटेड नागपूर या दवाखान्याचे नांव वैद्यकीय प्रतिपुर्ती करीता मान्यता असल्यामुळे खाजगी दवाखान्याच्या पॅनलमध्ये समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रस्ताव म.न.पा. सभेपुढे विचारार्थ व मंजुरीस्तव सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून महासभा ठराव क्र. २११ दि. ३०.०६.२००४ प्रमाणे या दवाखान्यास म.न.पा. पॅनलवर घेण्यास मंजूरी देण्यात आली, करीता प्रस्तावित विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 104 :– नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या विविध झोन अंतर्गत होणाऱ्या सार्वजनिक कार्यक्रमासाठी तसेच

धार्मीक कार्यक्रमासाठी फिरते शौचालय आवश्यक आहे. विभागाला नविन पांच संच (NGDA) Bio-Toilet Four Wheeled Trailed Mobile 10 Seater खरेदी करण्यासाठी निविदा मागवून दोन वर्षासाठी दरकरार करण्याचा तसेच पांच संच खरेदीवर अंदाजीत रु. 55,57,500/– खर्च अपेक्षीत आहे. हा खर्च आय–व्यय पद क्र. 597 मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 105 :– 1. हनुमाननगर झोन क्र.03,क्षेत्रीय कार्यालय नागपूर महानगरालिका सन 2012–2013 चे अंदाजपत्रकात एकुण तरतुद 631.53 लक्ष केलेली आहे. प्रभाग समिती ठराव क्र. 3 दिनांक 09.07.2012 अन्वये अंदाजपत्रकात फेरफार दुरुस्ती करुन स्थायी समितीला सादर करण्याचे अधिकार मा. सभापती यांना देण्यात आले. मा. सभापती, प्रभाग समिती यांना दिलेल्या अधिकारानुसार त्यांनी अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून पुनर्विनियोजनाच्या उपरोक्त प्रस्तावास एकमताने मंजूरी प्रदान केली.

2. तसेच म.न.पा. चे प्रस्तावित अर्थसंकल्पात प्रभाग निहाय निधी उपलब्ध करुन देतांना प्रभाग क्र. 62 हा नेहरुनगर झोन क्र. 05 येथे प्रस्तावित होता. परंतु नंतर प्रभाग क्र.62 हनुमाननगर झोन क्र.03 ला संलग्नित करण्यात आला. परंतु त्याप्रमाणात क्षेत्रिय निधीमध्ये बदल करण्यात आला नाही. या प्रभागाकरिता 71.69 लक्ष एवढा निधी येत असून हा निधी नेहरुनगर झोन क्र. 5 कडुन हनुमानगनर झोन क्र. 03 येथे वळता करुन मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून पुनर्विनियोजनाच्या उपरोक्त प्रस्तावास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 106:– नागपूर महानगरपालिका,नागपूर च्या सन 2012–2013 चे अंदाजपत्रकानुसार नेहरुनगर झोन क्र. 5 करीता विविध झोनल पदाअंतर्गत कामाकरीता पुनर्विनियोजन करुन अर्थसंकल्पीय तरतूदीचे आवंटन परिशिष्ट 'अ' व 'ब' नुसार प्रभाग समिती ठराव क्र. 3 दिनांक 17/07/2012 द्वारे दुरुस्तीसह मंजुर करण्यात आले आहे.

करिता प्रस्तावित विषय स्थायी समितीच्या सभेत मंजुरी प्रदान करण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेवून पुनर्विनियोजनाच्या उपरोक्त प्रस्तावास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 107 :– गांधीबाग झोन क्र.06, क्षेत्रीय कार्यालय नागपूर महानगरालिका सन 2012–2013 चे अंदाजपत्रकात एकुण तरतुद 599.86 लक्ष केलेली आहे. प्रभाग समिती ठराव क्र. 3 दिनांक 11.07.2012 अन्वये

अंदाजपत्रकात फेरफार दुरुस्ती करुन स्थायी समितीला सादर करण्याचे अधिकार मा. सभापती यांना देण्यात आले. मा. सभापती, प्रभाग समिती यांना दिलेल्या अधिकारानुसार त्यांनी अंदाजपत्रक तयार केले असुन सोबत जोडलेले परिशिष्ट 'अ' प्रमाणे अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून पुनर्विनियोजनाच्या उपरोक्त प्रस्तावास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 108ः– नागपूर महानगरपालिका,नागपूर च्या 2012–2013 मंजूर अंदाजपत्रकानुसार सतरंजीपुरा झोन क्र. 7 या क्षेत्रीय स्तरावरील कामास्तव तरतुद एकुण रु. 671.95 लक्ष प्राप्त झालेली आहे. त्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयातर्फे (झोनमध्ये समाविष्ट एकुण 8 प्रभाग करीता ) तयार करण्यात आलेल्या पदनिहाय अंदाजपत्रक परिशिष्ट अ,ब व क प्रमाणे प्रभाग समिती ठराव क्र. 3 दिनांक 07.07.2012 अन्वये मंजुरी प्राप्त आहे, त्यास स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असल्याने सोबत जोडलेलया परिशिष्ट अ,ब व क मधील अंदाजपत्रकात मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून पुनर्विनियोजनाच्या उपरोक्त प्रस्तावास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 109ः– नागपूर महानगरपालिका, अंदाजपत्रक सन 2012–2013 नुसार लकडगंज झोन क्र. 8 क्षेत्रीय कार्यालयाकरीता करण्यात आलेल्या अर्थ संकल्पीय तरतुदीनुसार प्रस्तावित कामाकरीता रु. 667.21 लक्ष पदनिहाय आवंटनास सोबत संलग्न परिशिष्ट ''ब'' प्रमाणे मंजुर करण्यास व मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदीमधील विविध झोनल पदा अंतर्गत आंवटीत राशीचे सोबत संलग्न परिशिष्ट ''अ'' नुसार पुर्नःनियोजन करण्यास प्रभाग समिती लगडगंज झोन क्र.8 चे ठराव क्र. 3 दि. 13.07.2012 नुसार मंजुरी प्राप्त असुन सदर ठरावास म.न.पा. ठराव क्र. 30 दि. 08.06.2012 नुसार स्थायी समितीला प्राप्त अधिकारानुसार मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून पुनर्विनियोजनाच्या उपरोक्त प्रस्तावास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 110 ः– प्रभाग समिती आसीनगर क्षेत्रीय कार्यालय क्र. 9 यांनी आर्थिक वर्ष 2012–13 चे मंजूर केलेले अर्थसंकल्प सहपत्र 'अ' प्रमाणे मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून पुनर्विनियोजनाच्या उपरोक्त प्रस्तावास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 111 ः– प्रभाग समिती ठराव क्र. 02 दि.30.06.2012 अन्वये क्षेत्रीय कार्यालयाने वर्ष 2012–2013 चे पुनःर्नियोजीत

अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून प्रस्तावित विषय दुरुस्तीसाठी कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 112 :– नागपूर शहरातील पावसाळी नाल्याचे व्यवस्थेकरीता ( स्ट्रॅार्म वॉटर ड्रेनेज सिस्टीम ) बृहत आराखडा

( Master Plan ) तसेच शहरातील नदया व सरोवरांचे पुनरुर्जिवना करीता NLCP/ NRCP, पर्यावरण व वनविभाग भारत सरकार यांचे मार्गदर्शक तत्वानुसार बृहद आराखडा व विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता प्रकलप सल्लागार म्हणून M/s STC - DRA (JV) मुंबई यांना स्थायी समिती ठराव क्र.10 दि.16.4.2007 व ठराव क्र. 4 दि. 24.4.2008 अन्वये रु.1,72,51,646 चे कार्यादेश देण्यात आले आहेत. या प्रमाणे सरोवरे व नदयांचे बृहत आराखडा व एकत्रित विस्तृत प्रकल्प अहवाल शासनाकडे सादर करण्यात आले.

नाग नदीचे पुनरुर्जिवना करीता रु. 118 कोटीची योजना महाराष्ट्र शासन व तद्नंतर केंद्र शासना कडे सादर केली असता, केंद्र शासनाने पत्र क्र. J- 27017/2/2011-NRCD-2 dt. 24/1/2012 अन्वये सुचना व त्रृटयांची पुर्तता करुन योजना पुन्हा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांचे कडून मिळालेल्या निर्देशाप्रमाणे प्रत्येक सरोवर व नदीचा विस्तृत प्रकल्प अहवाल वेगवेगळा करणे आवश्यक आहे.

नाग नदी बाबत केंद्र शासनाच्या सुचना व त्रृटींची पुर्तता करणे तसेच प्रत्येक सरोवर व नदीचे वेगवेगळे विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे या कामाचा समावेश सल्लागार M/s STC - DRA (JV) यांचे मुळ कार्यक्षेत्रात नाही.

परंतु ही व वाढीव कामे सल्लागारांकडून करुन घेणे गरजेचे असून या वाढीव कामाकरिता 40.0 लक्ष रुपये खर्च अपेक्षित आहे. करीता खालील प्रस्तावाला मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. शासनाचे दिशा निर्देशाप्रमाणे विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे तसेच शासनाने उपस्थित केलेले मुद्यांची पुर्तता करुन मंजुरी प्राप्त करणे, याकरीता येणाऱ्या रु.

40,00,000 चे खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

2. मुळ अटी व शर्थीच्या अधीन राहून देयकाचे भुगतान खालील प्रमाणे करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ.क्र. | विवरण | हप्त्याची टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | विस्तृत प्रकल्पाचे अहवाल सादर करणे | 30% |
| 2 | शासन निर्देशानुसार मुद्यांची पुर्तता करुन प्रकल्प अहवाल पुनः सादर करणे | 20% |
| 3 | प्रकल्प अहवाल सादरीकरण व मंजुरी (महाराष्ट्र शासन ) | 25% |
| 4 | प्रकल्प अहवाल सादरीकरण व मंजुरी (भारत सरकार ) | 25% |

3. सल्लागाराचे रुपये 2,12,51,646 सुधारित प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
4. उपरोक्त खर्च पद क्र. 733 ( 2011 – 2012) मधुन करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 113 :– नागपूर शहरात राबविण्यांत येत असलेल्या 24×7 पाणीपुरवठा प्रकल्पात, स्लम वस्त्यांमध्ये घरोघरी नळ योजने अंतर्गत ज्या उपभोक्त्याकडे नळ कनेक्शन नाहीत/अनधिकृत नळ आहेत अश्या उपभोक्त्यांना नवीन नळ कनेक्शन देताना/ अनधिकृत नळ कनेक्शन नियमित करताना म.न.पा.पाणीपट्टी अधिनियम कलम 6(क) अन्वये घ्यावयाचे रुपये 500/600 कनेक्शन शुल्क हे एकमुश्त न घेता रु. 100/–प्रति माह, प्रमाणे उपभोक्त्यांच्या पाण्याच्या देयकातुन वसुल करण्याबाबत आयुक्त, म.न.पा. यांनी घेतलेल्या निर्णयाची नोंद घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून जे.एन.आर.यु.एम. या प्रकल्पा अंतर्गत या कामासाठी मिळालेल्या निधी अंतर्गत १.२५ लक्ष झोपडपट्टीतील रहिवासी नागरिकांना निशुल्क नळ कनेक्शन करण्यासाठी केंन्द्र सरकार कडून निधी म.न.पा.स प्राप्त झाला आहे. म्हणून एकच कामाकरिता शासनाकडून व नागरिकांनकडून निधी घेणे न्यायसंगत होणार नाही. असे स्थायी समितीस वाटते, तेव्हा सर्व झोपडपट्टीतील रहिवासी नागरिकांना निशुल्क नळ कनेक्शन देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली. तसेच हा धोरणात्मक निर्णय असल्यामुळे सभागृहाच्या मान्यते करीता ठेवण्यास ही सभा एकमताने शिफारस करते असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

ठराव क्रमांक 114 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता /— हरीष दुबे

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता /— दयाशंकर तिवारी

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर